नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १९७ Issue - 197 | वार रविवार दि. ७ डिसेंबर २०२५ Blow- Sunday Date 7 December 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# भारताने मालिका जिंकली

## भारताने दक्षिण आफ्रिकेचा ९ विकेटने उडवला धुव्वा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हैदराबाद : कसोटी मालिकेत दक्षिण आफ्रिकेकडून ०-२ असा पराभव पत्करल्यानंतर टीम इंडियाने वनडे मालिकेत जबरदस्त पुनरागमन करत पराभवाचा वचपा काढला. के.एल. राहुलच्या नेतृत्वाखाली भारताने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत २-१ असा विजय मिळवत मालिका खिशात घातली. विशाखापट्टनम येथे खेळल्या गेलेल्या निर्णायक तिसऱ्या सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा ९ विकेटने धुव्वा उडवला. आधी गोलंदाजीत कुलदीप यादव आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी घातक मारा केला. त्यानंतर भारतीय फलंदाजांत यशस्वी जैस्वाल आणि रोहित शर्मा यांनी तुफानी कामगिरी करून संघाला सहज विजय मिळवून दिला. तब्बल नऊ महिन्यांच्या अंतरानंतर भारतातील मैदानात खेळताना रोहित शर्मा आणि विराट कोहलीसाठी ही वनडे मालिका अत्यंत संस्मरणीय ठरली.



**दक्षिण आफ्रिका २७० धावांवर ऑलआउट**

नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजीस उतरलेल्या दक्षिण आफ्रिका संघाची सुरुवात खराब झाली. पहिल्याच षटकात अर्शदीप सिंगने रयान रिकेल्टनला शून्यावर बाद करत भारताला पहिली विकेट मिळवून दिली. मात्र, त्यानंतर क्विंटन डी कॉक आणि कर्णधार टेम्बा बावुमा यांनी दुसऱ्या विकेटसाठी ११३ धावांची महत्त्वाची भागीदारी करत आफ्रिकेला सामन्यात परत आणले. पण, रवींद्र जडेजाने बावुमाला ४८ धावांवर बाद करत ही जोडी फोडली. यानंतर प्रसिद्ध कृष्णा आणि कुलदीप यादव यांनी धारदार मारा करत आफ्रिकेच्या फलंदाजांना क्रीजवर टिकण्याची संधीच दिली नाही. अखेर ४७व्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर संपूर्ण संघ २७० धावांवर गडगडला. त्यामुळे निर्णायक वनडे सामन्यात भारतासमोर २७१ धावांचे लक्ष्य ठेवले.

**कुलदीप यादव आणि प्रसिद्ध कृष्णाने केली द. आफ्रिकेची कोंडी**

प्रोटियाजविरुद्ध भारतीय गोलंदाजी कमालीची प्रभावी ठरली. अर्शदीप सिंगने पहिल्याच ओव्हरमध्ये महत्वपूर्ण बळी घेतला, जो त्याचा या सामन्यातील एकमेव विकेट ठरला. तर प्रसिद्ध कृष्णा आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी ४-४ विकेट्स घेत आफ्रिकेची कोंडी केली. याशिवाय रवींद्र जडेजाच्या खात्यातही १ विकेट जमा झाला.

**यशस्वी जैसवाल आणि रोहित शर्माची धमाकेदार सुरुवात**


लक्ष्याच्या पाठलागात यशस्वी जैसवाल आणि रोहित शर्माने भारताला जबरदस्त सुरुवात दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी १५५ धावांची भागीदारी केली. रोहितने या सामन्यात आपले ६१वे वनडे अर्धशतक केले आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २०,००० धावा पूर्ण केल्या. रोहित ७५ धावांवर फलंदाजी करून बाद झाला. यानंतर मैदानात विराट कोहली आला, जिने या मालिकेत सातत्याने आपली ताकद दाखवली आहे. दरम्यान, यशस्वीने आपल्या वनडे करिअरातील पहिले शतक ठोकले आणि भारताला विजय मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

कोहलीने सलग चौथ्या सामन्यात अर्धशतक ठोकले. यशस्वीने १२ चौके आणि २ षटकारांसह १२१ चेंडूत ११६ धावा केल्या, तर कोहलीने ४५ चेंडूत ६ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद ६५ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेच्या बाजूने फक्त केशव महाराजला फलंदाजीत यश मिळाले.

# भरधाव क्रेटाची स्विफ्टला समोरासमोर धडक; तीन जागीच ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

परभणी: परभणीत आज क्रेटा आणि स्विफ्ट डिझायर गाडीचा समोरासमोर अपघात होऊन तिघांचा घटनास्थळीच मृत्यु झाला तर दोघे गंभीर जखमी झाल्याचे घटना वसमत रस्त्यावरील राहाटी परिसरातील विश्वशांती ज्ञानपीठ परिसरात शनिवारी (दि. ६) रात्री सव्वा बारा ते साडेबाराच्या वाजण्यास घडली. जखमींवर परभणी येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून या प्रकरणी अज्ञात चालकाविरुद्ध ताडकळस पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



फिर्यादीचा चुलत भाऊ बाबाराव दतराव साखरे हा स्विफ्ट डिझायर कार क्रमांक - एमएच ३८ एडी ३५४१ या वाहनातून आरळ येथून परभणीच्या दिशेने येत असताना समोरून येत असलेली क्रेटा कार क्रमांक - एमएच २२ बीसी ७८८८ च्या चालकाने निष्काळजीपणे आणि भरधाव वेगात कार चालवून समोरून जोरदार धडक दिली.


या अपघातात फिर्यादीचा चुलत भाऊ बाबाराव दतराव साखरे रा. आरळ ता. वसमत, विमलबाई बालासाहेब जाधव रा. पिंगळी ता. परभणी आणी कांताबाई अंबादास कातोरे रा. आरळ ता. वसमत हे घटनास्थळीच मुत्यु पावले. तर त्यांच्या सोबतचे साईनाथ रामचंद्र काकडे रा. आरळ ता. वसमत, हरी बालासाहेब जाधव रा. पिंगळी ता. परभणी हे दोघे गंभीर जखमी झाले. त्यांना परभणी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच ताडकळस पोलिसांचे सहाय्यक पोलिस निरीक्षक गजानन मोरे, रणखांब, रन्हेर, चोरघडे यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणी सखाराम सटवाजी साखरे रा. आरळ ता. वसमत यांच्या फिर्यादीवरून क्रेटा कार क्रमांक एमएच २२ बीसी ७८८८ च्या चालकावर भारतीय न्याय संहिता कायद्याच्या अनुच्छेद १०६(१), २८१, १२५(अ) आणी १२५(ब) नुसार ताडकळस पोलिसांत शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ताडकळसचे ठाणेदार सहायक पोलिस निरीक्षक गजानन मोरे हे करीत आहेत.

दरम्यान, या घटनेनंतर रस्ते प्रवासात होणाऱ्या अपघातांचा आणि मृतांचा प्रश्न किती गंभीर आहे हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# ...तर उपमुख्यमंत्रीपदही रद्द करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



**उद्धव ठाकरेंची सरकारकडे मोठी मागणी**

मुंबई: शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्यातील नगरपालिका निवडणुका, मतदार याद्यांमधील त्रुटी, शेतकरी पॅकेज आणि विरोधी पक्षनेतेपद यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवरून सध्याच्या सरकारवर जोरदार टीका केली आहे. निवडणुकांमध्ये हुकूमशाही वाढत असून 'बूथ कॅप्चरींग' ऐवजी आता 'निवडणूकच कॅप्चर' करण्याचा प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. मतदार याद्यांमधील घोळ इतका मोठा आहे की, सर्वोच्च न्यायालयाने यावर स्वतःहून लक्ष घालून लोकशाहीसाठी महत्त्वाच्या असलेल्या या विषयावर त्वरित हस्तक्षेप करावा, अशी मागणी त्यांनी केली. जोपर्यंत मतदार याद्यांमधील विसंगती दूर होत नाही, तोपर्यंत निवडणुका घेऊ नयेत, असेही ते म्हणाले.

ठाकरे यांनी राज्यात विरोधी पक्षनेतेपद अद्यापही रिक्त ठेवल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. विधिमंडळाच्या पहिल्या अधिवेशनापासून या पदाची मागणी असूनही एक वर्षानंतरही ते रिक्त आहे, हे इतिहासात प्रथमच घडत आहे, असे ते म्हणाले. सरकारला विरोधी पक्षनेतेपदाची भीती का वाटते, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. जर कायद्याचा हवाला देऊन ही भूमिका घेतली जात असेल, तर उपमुख्यमंत्रीपदाचे कायदेशीर अस्तित्व नसल्याने तेही रद्द करावे, अशी मागणी त्यांनी केली.

# सरकार ॲक्शन मोडवर, किलोमीटर नुसार फ्लाईट तिकिटांचे दर जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: इंडिगो एअरलाइन्सच्या उड्डाणांमधील मोठ्या गोंधळामुळे आणि तिकिटांच्या वाढलेल्या दरांमुळे प्रवाशांना होणारा त्रास कमी करण्यासाठी सरकारकडून पाऊल उचलण्यात आले आहे. नागरी उड्डाण मंत्रालयाने सर्व एअरलाइन्ससाठी तिकिटांच्या दरांची कमाल मर्यादा निश्चित केली आहे. यामुळे एअरलाइन्स प्रवाशांकडून अवाजवी पैसे वसूल करू शकणार नाहीत. प्रवाशांकडून सातत्याने तक्रारी येत होत्या की एअरलाइन्स त्यांच्याकडील अडचणींचा फायदा घेऊन खूप जास्त भाडे आकारत आहेत. आपल्या नियामक अधिकारांचा वापर करून, मंत्रालयाने एअरलाइन्सना 'वाजवी आणि योग्य' दर ठेवण्याचे आदेश दिले आहेत. सर्व एअरलाइन्सना या नवीन नियमाचे त्वरित पालन करावे लागेल. जोपर्यंत देशभरातील विमानसेवा पूर्ववत होत नाही, तोपर्यंत ही भाडे मर्यादा लागू राहील.

नवीन भाडे मर्यादेनुसार, ५०० किलोमीटरपर्यंतच्या देशांतर्गत उड्डाणांसाठी कमाल भाडे ७,५०० रुपये असेल. ५०० ते १००० किलोमीटरच्या मार्गांसाठी कमाल भाडे १२,००० रुपये, १००० ते १५०० किलोमीटरच्या मार्गांसाठी कमाल भाडे १५,००० रुपये आणि १५०० किलोमीटरपेक्षा जास्त लांबच्या उड्डाणांसाठी कमाल भाडे १८,००० रुपये निश्चित करण्यात आले आहे. हा नियम सर्व एअरलाइन्स आणि बुकिंग प्लॅटफॉर्मवर सारखाच लागू होईल.

हजारो प्रवासी, ज्यात वृद्ध, विद्यार्थी, रुग्ण आणि अडकलेले कुटुंबे यांचा समावेश आहे, ते आधीच प्रवासाच्या अनिश्चिततेचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत एअरलाइन्सनी नफा कमावणे योग्य नाही, असे सरकारचे म्हणणे आहे. मंत्रालयाने सांगितले की, अत्यावश्यक प्रवासाला परवडणारे ठेवणे हे जनहिताचे आहे. विशेषतः जेव्हा प्रवाशांच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे अडचणी येत असतील. हा नियम पाळला जात आहे की नाही, यावर लक्ष ठेवण्यासाठी मंत्रालय एअरलाइन्स आणि ऑनलाइन ट्रॅव्हल पोर्टल्सकडून रिअल-टाइम डेटा घेईल. मंत्रालयाने इशारा दिला आहे की, जी एअरलाइन या मर्यादेचे उल्लंघन करताना आढळेल, त्या कंपनीवर 'त्वरित सुधारात्मक कारवाई' केली जाईल. मंत्रालयाने असेही म्हटले आहे की, या अस्थिर काळात ग्राहकांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी भाड्यामध्ये शिस्त असणे खूप महत्त्वाचे आहे.

याव्यतिरिक्त, नागरी उड्डाण मंत्रालयाने इंडिगोला रद्द झालेल्या किंवा खूप उशिरा चाललेल्या उड्डाणांशी संबंधित सर्व थकीत परतावा रविवार, ७ डिसेंबरच्या रात्री ८ वाजेपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. एअरलाइन्सना संकटामुळे प्रभावित झालेल्या प्रवाशांवर रीशेड्यूलिंग शुल्क न लावण्यासही सांगितले आहे.

देशाच्या विविधतेला एकत्र बांधणारे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिले : राज्यपाल आचार्य देवव्रत

दादरच्या चैत्यभूमी येथे ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या दूरदृष्टीमुळे भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कोणत्याही राष्ट्रात युगपुरुष जन्माला येतात तेव्हा सामाजिक न्यायाची चळवळ बळकट होते. भारत हा विविधतेने नटलेला देश असून इतक्या मोठ्या राष्ट्रात एकता, न्याय व समाजाची संघटित भावना दृढ करण्यासाठी संविधान निर्माण करणे हे अत्यंत मोठे व ऐतिहासिक कार्य होते. देशाच्या सामाजिक विविधतेत सर्वांना एकत्र बांधणारे व समान अधिकार प्रदान करणारे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्राला दिले, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

मुंबईतील दादरच्या चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, माजी मंत्री संजय बनसोडे, आमदार कालिदास कोळंबकर,आमदार चित्रा वाघ,आमदार अमित साटम, माजी खासदार तथा महाराष्ट्र राज्य त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष डॉ नरेंद्र जाधव, माजी खासदार राहुल शेवाळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आनंदराज आंबेडकर, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, समन्वय समितीचे उपाध्यक्ष महेंद्र साळवे आदींसह समाजाच्या सर्वक्षेत्रातील मान्यवर तसेच डॉ. बाबासाहेबांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले, एखादे व्यक्तिमत्त्व जगातून गेले तरी त्यांचे विचार व कार्य जनतेच्या अंत:करणात सदैव जिवंत राहतात, त्यातूनच बाबासाहेब अमर आहेत. कठोर परिस्थितीतून शिकून त्यांनी संपूर्ण समाजाचा भविष्यकाळ बदलण्यासाठी शिक्षणाला सर्वात मोठे शस्त्र मानले. एक सुशिक्षित व्यक्ती संपूर्ण घराचे, समाजाचे आणि देशाचे भविष्य बदलू शकतो हा संदेश त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दिला.



**ज्ञानाच्या बळावर बाबासाहेबांनी समाजात समता प्रस्थापित केली- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विषमता दूर करून समाजात समता, बंधुता आणि सर्वांना समान संधी देणारे संविधान देशाला दिले. ज्ञानाच्या बळावर त्यांनी समाजात समतेची जाणीव दृढ केली, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, बाबासाहेबांच्या दूरदृष्टीमुळे आज भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरला असून लवकरच तिसऱ्या क्रमांकावर झेप घेणार आहे. राष्ट्राच्या प्रगतीचा पाया बाबासाहेबांनीच घातल्याचे त्यांनी नमूद केले. ऊर्जा सुरक्षेच्या क्षेत्रात डॉ. आंबेडकरांचे योगदान अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, राष्ट्रीय विद्युत ग्रीडची संकल्पना भारताने बाबासाहेबांमुळे वेळेत स्वीकारली. त्यातून देश ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करत आहे. भारतीय लोकशाहीची भक्कम पायाभरणी आणि सामान्य जनतेच्या हक्कांचे रक्षण हे बाबासाहेबांच्या संविधानामुळेच शक्य झाले, असेही श्री.फडणवीस यांनी स्पष्ट केले. जगातील सर्वोत्तम संविधान भारताकडे असून प्रत्येक प्रश्नाचे उत्तर याच संविधानात मिळते, असे त्यांनी नमूद केले. आगामी काळात चैत्यभूमी परिसरातील स्मारक विकासाची कामे पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

**महामानव बाबासाहेबांचे विचार राष्ट्राला मार्गदर्शक- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाची निर्मिती करून देशाच्या लोकशाहीला दृढ पाया दिला. त्यांनी उभारलेला संघर्ष हा मानवमुक्तीचा, समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता प्रस्थापित करण्याचा होता, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा ही बाबासाहेबांनी जगाला दिलेली त्रिसूत्री आजही समाज परिवर्तनासाठी मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या चार मूल्यांवर आधारित संविधान तयार करून तळागाळातील वंचित व दुर्बल घटकांना सशक्त करण्याचे ऐतिहासिक कार्य डॉ. आंबेडकरांनी केले, असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

सर्वप्रथम भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करून डॉ. बाबासाहेबांना अभिवादन केले. यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते सर्व भिक्खूंना चिवरदान देण्यात आले. त्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने आयोजित छायाचित्र प्रदर्शनास मान्यवरांनी भेट दिली. यावेळी चैत्यभूमीवर हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्य त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष डॉ नरेंद्र जाधव यांनी सर्व मान्यवरांना संविधानाची प्रत दिली.

# गोगांव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

## परिस्थितीशी संघर्ष करून देशाला लोकशाही तत्वाचे संविधान निर्माते म्हणजेच बाबासाहेब आंबेडकर : कमलाकर सोनकांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील गोगांव येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ग्रामपंचायत, जिल्हा परिषद शाळा, डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर येथे अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर त्रिशरण पंचशील घेऊन सर्व समाज बांधवांच्या उपस्थितीत विनम्र अभिवादन करण्यात आले.

जिल्हा परिषद शाळा गोगांव येथे आयोजित कार्यक्रम अध्यक्षस्थानी निवृत्ती सुरवसे हे होते प्रतिमा पूजन प्रदीप जगताप कल्याणराव बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले नेहा डिजिटल सेवा वतीने विध्यार्थींना एक वही एक पेन वाटप उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड यासह मान्यवराच्या हस्ते करण्यात आले यावेळी बोलताना कमलाकर सोनकांबळे म्हणाले की वंचित घटकातील लोकांना न्याय देण्यासाठी बाबासाहेबानी लढा दिले त्याच्या जीवनात आलेले संघर्ष खूप मोठे असून त्यांना अनेक मान अपमान यांना तोंड द्यावे लागले तरी देखील त्यांनी समाजाच्या हिताचे लढा थांबावले नाही शेवटच्या घटकांपर्यत न्याय देण्यासाठी लढा देत राहिले सर्व जाती धर्मातील लोकांनी या देशात गुण्या गोविदाने व सुरक्षित आहेत ते फक्त बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानामुळे बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे आज गरीब श्रीमत यांना एकच मतांचा अधिकार मिळाले आहे यामुळेच आज भारतातील लोकशाही टिकून राहिले आहे अशा महामानवाचे आदर्श आजच्या युवा पिढी घ्यावे





यावेळी बोलताना कल्याणराव बिराजदार म्हणाले की, नेहा डिजीटल सेवा गोगांव, या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहे, बाबासाहेबांनी शिक्षणासाठी घेतलेले अनुभव या उद्देशाने आज नेहा डिजीटल सेवा गोगांव या माध्यमातून अभिवादन स्वरूपात शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून अभिवादन केले.

यावेळी मुख्याध्यापक फुंडलिक वाघमारे, शंकर कारभारी, भोसले मॅडम. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर जगताप, आयोजन नितीन गायकवाड, सूर्यकांत जिरगे शरणपा कलशेट्टी यासह गावकरी मोठया संख्येने उपस्थिती होते.

ग्रामपंचायत येथे आयोजित कार्यक्रम अध्यक्षस्थानी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे हे होते प्रतिमा पूजन नबीलाल नदाफ, कलप्पा बनसोडे, चिंतानंद सोनकांबळे यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर येथे आयोजित कार्यक्रम अध्यक्षस्थानी आकाश गायकवाड हे होते प्रतिमा पूजन प्रदीप जगताप दयानंद जिरगे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, मौला नदाफ, परमेश्वर गायकवाड, सुरेश सोनकांबळे, बलभीम बनसोडे, संजय गायकवाड, मधुमती गायकवाड, अंगणवाडी सेविका भाग्यश्री सोनकवडे, तेजबाई गुरव, विजयकुमार गायकवाड, लक्ष्मण गायकवाड, डॉ. कलेनी कोंडे, यासह मान्यवर गावकरी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सैनिक स्कूल येथे कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : आज दिनांक ४/१२/२०२५ वार गुरुवार रोजी, श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तुळजापूर,येथे मा. प्राचार्य श्रीमान घोडके सर यांच्या मार्गदर्शनाखाली. उपजिल्हा रुग्णालय तुळजापूर येथील छ्च कुष्ठरोग तंत्रज्ञ श्री ज्ञानदेव डोंगरे व श्री सुजित माळी सर यांनी सैनिकी विद्यालय येथे विद्यार्थ्यांना कुष्ठरोगाविषयी माहिती सांगितली व विद्यार्थ्यांची तपासणी केली. कुष्ठरोग आजार हा काय आहे? कशापासून होतो ? कुष्ठरोगाची चिन्हे लक्षणे काय आहे? कुष्ठरोग झाल्यास काय काळजी घ्यावी. कुष्ठरोगाची औषधोपचार काय आहेत? कुष्ठरोगाचे औषध उपचार कुठे होतात? या विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. यावेळी रसायनशास्त्र विभाग प्रमुख श्री. कदम सर आणि विद्यालयातील नर्सिंग विभाग प्रमुख श्री. काशीद सर यांनी कुष्ठरोग छ्च अधिकारी यांचे स्वागत केले . त्यानंतर माळी सर आणि डोंगरे सर यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना कुष्ठरोगा विषयी माहिती सांगितली.तसेच विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात कुष्ठरोग झाल्यास काय करावे ? याविषयी माहिती सांगितली. यावेळी मा. प्राचार्य घोडके सर यांनी मार्गदर्शन केले . कार्यक्रमासाठी विद्यालयातील सोनकांबळे सर व खान सर हेही उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन श्री दिलीप सलगर सर यांनी केले.

# पंढरपुरात नामवंत हॉस्पिटलच्या डॉक्टरकडून चुकीची रक्त दिल्याने बाळांतीन महिलेचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर प्रतिनिधी

पंढरपूर शहरातील लिंक रोड असलेल्या हॉस्पिटलमध्ये महिला बाळातीन साठी आली होती. मुलगा झाला यानंतर रक्तस्त्राव होऊ लागल्याने तुला रक्त देण्यास सुरुवात केली. चुकीचे रक्त असल्यामुळे त्या महिलेचा मृत्यू झाला. नातेवाईकाकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पंढरपूर तालुक्यातील रहिवासी आडवी येथील आरती सुरज चव्हाण वय (वर्ष २२) ही पंढरपूर शहरातील लिंक रोड जवळ असलेल्या हॉस्पिटलमध्ये बाळांतीन होण्यासाठी दाखल झाली होती. तिला मुलगा झाला पण रक्तच्राव होऊ लागला. रक्त कमी असल्याने नातेवाईकांना चिठ्ठी लिहून दिली नातेवाईकांना रक्त आणण्यासाठी सांगितले. रक्त आल्यानंतर ते रक्त त्या महिलेस देण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्या महिलेची तब्येत आणखीन खालावली तदनंतर पुढील उपचारासाठी ला सोलापूरला घेऊन जावा अशी सांगितले.

नातेवाईकांनी तात्काळ सोलापूर येथील खाजगी लुग्णालयामध्ये तेथे तीन दिवस मृत्यूची झुंज देऊन अखेर आरतीचा मृत्यू झाला. मुळे नातेवाईकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. नवजात बालक आईच्या मायेपासून पोरके झाले आहे त्याचा पुढील तपास पोलीस करीत आहे.



**निफाड पंचायत समितीतर्फे दिव्यांगांना साहित्य वाटप करताना गटविकास अधिकारी नम्रता जगताप, गटशिक्षणाधिकारी विलास साळी आदी.**

# निफाडला दिव्यांग विद्यार्थ्यांना टीएलएम साहित्य वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जागतिक दिव्यांग दिनानिमित्त निफाड पंचायत समिती तर्फे दिव्यांग विद्यार्थ्यांना ढङच् साहित्य पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी नम्रता जगताप, गटशिक्षणाधिकारी विलास साळी यांचे हस्ते वाटप करण्यात आले.

याप्रसंगी दिव्यांग विद्यार्थांचा निफाड पंचायत समितीच्या प्रशासनाने पुष्पगुच्छ देवून सन्मान केला.

सदर साहित्य वाटप करण्यासाठी आयडी समन्वयक मुकेश जगताप, विशेष शिक्षक दौलत जामकर, विजया अवचार, अर्चना राणे, स्नेहल गीते, शिला मोरे, रेणुका घोटेकर , वनिता मंडलिक,विषय तज्ञ विजय खालकर, आत्माराम न्याहारकर, प्रमोद चव्हाण , साळुंखे आदी उपस्थित होते.

# स्वेरीत ‘इनोव्हेशन डे’ आणि ‘आयट्रिपलई डे’ उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागाच्या वतीने संस्थेचा ‘नवोन्मेष दिन’(इनोव्हेशन डे) आणि ‘आयट्रीपल ई डे’ हे दोन्ही उपक्रम बुधवार, दि.१५ ऑक्टोबर २०२५ रोजी संयुक्तपणे साजरे करण्यात आले.



भारताचे माजी राष्ट्रपती आणि ‘भारताचे क्षेपणास्त्र पुरुष’ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम’ यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांमध्ये ‘नवोन्मेष, तंत्रज्ञान आणि उद्योजकते’विषयी प्रेरणा निर्माण करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून इव्हॉल्विंग एक्स सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संस्थापक अमोल नितवे हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना अमोल नितवे यांनी ‘नवोन्मेषी विचारसरणी, स्टार्टअप संस्कृती आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वास्तवातील समस्यांचे समाधान’ या विषयांवर मार्गदर्शन केले. ‘१८८४ साली आयईईई सदस्यांनी प्रथमच एकत्र येऊन आयट्रीपल ई दिन उत्सव साजरा करण्यास सुरूवात केली. जगभरात तांत्रिक कल्पनांची देवाण घेवाण करण्याच्या संदर्भात हा दिवस साजरा केला जातो. यावेळी ॲटलस स्किलटेक विद्यापीठाचे वरिष्ठ संचालक व प्राध्यापक डॉ. शशिकांत पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आयईईई उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्यास आणि नवोन्मेष आधारित शिक्षणाकडे वळण्यास प्रोत्साहित केले. यानंतर अमोल नितवे यांनी स्मार्ट इंडिया हॅकाथॉन (एस. आय. एच.) साठी निवडलेल्या संघांतील सदस्यांना विशेष मार्गदर्शन केले. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती यांनी सर्व आयट्रीपलई संबंधित उपक्रमांचा आढावा सादर केला. आय.आय. सी.चे प्रेसिडेंट डॉ.दिग्विजय रोंगे यांनी संस्थात्मक आय. आय. सी. बाबत सविस्तर माहिती दिली. हा उपक्रम भारताचे माजी राष्ट्रपती व थोर शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे सुंदर प्रतिबिंब होते आणि हा उपक्रम ‘मानवजातीसाठी तंत्रज्ञानाचा विकास’ या आयट्रीपलईच्या ब्रीदवाक्याची जाणीव करून देणारा ठरला. यासाठी सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. स्मिता गावडे यांनी काम पहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नीता तळवळकर, स्वरा तासगांवकर आणि समृद्धी मोरे यांनी केले तर आभार डॉ. दिग्विजय रोंगे यांनी मानले.

# ‘दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबराच्या गजरात कानिफनाथ गडावर दत्त जयंती सोहळा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले बोपगाव (ता. पुरंदर) येथील जागृत देवस्थान श्रीक्षेत्र कानिफनाथ गडावर गुरुवारी (दि.४) दत्त जयंती सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमांनी पार पडला. यावेळी ’दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा’चा गजर घुमत होता.

कानिफनाथ गडावर दत्त जयंतीनिमित पहाटे ४ वाजता श्री नाथांना दही, दूध, पंचामृताने अभिषेक करण्यात आला. त्यानंतर काकड आरती झाली सकाळी ७.३० ते ९.३० उमेश व महेश प्रस्तुत अभंगवाणी कार्यक्रम झाला. सकाळी १० ते १२ वाजता हभप म्हस्कु महाराज कामठे यांचे दत्त जन्माचे सुंदर कोर्तन झाले. त्यांना साथ कानिफनाथ वारकरी शिक्षणसंस्था आळंदी देवाची यांनी दिली. दुपारी १२ ते १ दत्तमंदिरातून

**पालखीत पादुका ठेवून भाविक**

भक्तांनी पारंपरिक ढोलताशांच्या गजरात मंदिर प्रदक्षिणा झाली. दुपारी १ ते ३ वाजता चांबळी आणि वडकी ग्रामस्थांच्या वतीने भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. सायं ५ ते ७ हरीपाठ झाला.

दत्तजयंती उत्सवाचे आयोजन नवनाथ देवस्थान पंचायत कमिटी ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानोबा फडतरे, उपाध्यक्ष दिपक फडतरे , सचिव जयवंत फडतरे, खजिनदार नागेश फडतरे, संचालक,शिवाजि जगदाळे, प्रकाश (नाना) फडतरे, प्रकाश (भाऊ) फडतरे, सुरेश फडतरे, महादेव फडतरे, नितीन फडतरे, रमेश फडतरे, मंगेश फडतरे, सोनबा फडतरे , व्यवस्थापक संतोष गोफणे व ज्ञानेश्वर भजनी मंडळ बोपगांव व समस्त ग्रामस्थांनी केले. श्री नवनाथ देवस्थान पंचायत कमिटी ट्रस्टच्या वतीने भक्तांना पाणी, पार्किंग, महाप्रसाद सेवा देण्यात आली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# दिव्यांगांच्या पदसुनिश्चितीसाठी तज्ज्ञ समितीची पुनर्रचना : सचिव तुकाराम मुंढे

## प्रक्रियेसाठी एकसमान कार्यपद्धती निश्चित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दिव्यांग व्यक्तींना शासकीय, निमशासकीय सेवेत नियुक्ती आणि पदोन्नतीमध्ये चार टक्के आरक्षणाचा कायदेशीर हक्क प्रभावीपणे मिळावा, यासाठी पदसुनिश्चिती प्रक्रियेसाठी एकसमान कार्यपद्धती (एसओपी) तयार केली आहे. पदसुनिश्चिती प्रक्रिया अधिक शास्त्रीय आणि पारदर्शक करण्याच्या हेतूने तज्ज्ञ समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो दिव्यांग उमेदवारांसाठी रोजगार, सर्व स्तरांवर समान संधी सुनिश्चित होण्यास मदत होणार असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

सचिव तुकाराम मुंढे म्हणाले, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पदसुनिश्चिती प्रक्रियेसंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. शासकीय, निमशासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच स्वायत्त संस्था आणि महामंडळांमधील मंजूर पदांचा सखोल आढावा घेऊन दिव्यांग व्यक्ती कोणत्या पदांवर कार्यक्षमतेने काम करू शकतील, हे ओळखणे आता बंधनकारक राहणार आहे. प्रत्येक मंत्रालयीन विभागात यासाठी तज्ज्ञांचा समावेश असलेली समिती स्थापन करेल.

प्रत्येक मंत्रालयीन विभागाच्या या समितीत अंध-अल्पदृष्टी, श्रवणदोष, अस्थिव्यंगता, स्वमग्नता, विशिष्ट शिक्षण अक्षमता व मानसिक आजार अशा विविध प्रवर्गांतील किमान एका तज्ज्ञाचा समावेश असेल. समितीचे अध्यक्ष त्या विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव राहतील.

समिती सहाय्यक तंत्रज्ञानातील विकास, जागतिक रोजगार मानके आणि पदांच्या जबाबदारीचे स्वरूप लक्षात घेऊन विभागातील पदांची योग्यतापरीक्षण करण्यासोबतच पदसाखळीतील सर्व स्तरांचा विचार करून पदसुनिश्चिती प्रस्ताव सादर करणार आहे. दिव्यांगांसाठी सुयोग्य नसलेल्या पदांना सूट दिली जात असल्यास, ती जास्तीत जास्त तीन वर्षेच वैध राहणार असून त्याचे पुनरावलोकन अनिवार्य असल्याचे सचिव मुंढे यांनी सांगितले.

सचिव मुंढे म्हणाले, प्रत्येक विभागाने दरवर्षी १ जानेवारी रोजी पदसुनिश्चितीची अद्ययावत स्थिती त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे आणि तिची प्रत आयुक्त, दिव्यांग कल्याण तसेच दिव्यांग कल्याण विभागास सादर करणे बंधनकारक राहील. तसेच सरळसेवा भरती व पदोन्नती करताना संबंधित भरती यंत्रणेकडे तीन वर्षात एकदा पदसुनिश्चितीचा आढावा घेतल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

याबाबतचा शासन निर्णय दिव्यांग कल्याण विभागाने निर्गमित केला असून महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# पंढरपूर शहरामध्ये स्वामी विवेकानंद चौकामध्ये दत्त जयंती उत्साहात साजरी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरामध्ये स्वामी विवेकानंद चौक येथे दत्त जयंती उत्साहामध्ये साजरी करण्यात आली दत्ताच्या मंदिरामध्ये फोटोचे पूजन करून सकाळपासून मंदिरामध्ये दर्शनासाठी भक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

भजन कार्यक्रम व संध्याकाळी सहा वाजता श्रीच्या चरणावर पुष्पस्थिती झाल्यानंतर ग्रामस्था तर्फे मोठ्या प्रमाणात दर्शनाची संध्याकाळी साडेनऊ वाजेपर्यंत भक्तजनांनी दर्शनासाठी गर्दी केली होती दिनांक ५/ १२ /२०२५ रोजी प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी महाप्रसादाचे वाटप दुपारी बारा वाजल्यापासून ते साडेतीन वाजेपर्यंत महाप्रसादाचे वाटप करण्यात आले होते व पंढरपूर शहरासह तालुक्यातील भक्तजनांनी महाप्रसादाचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतलेला आहे. महाप्रसादाचे वाटप पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी मा श्री प्रशांत डेंगळे साहेब यांच्या शुभहस्ते श्रीच्या मूर्तीची पूजन करून येथे महाप्रसादाचे वाटप करण्यात आले यावेळी दत्तजयंती मंडळाचे श्री मंगेश महमाने, मा श्री राजेंद्र कोरके पाटील, श्री प्रमोद आटकळे, श्री अजय पालसांडे, राजू माळी, अंकुश शेळके, सोमा पांढरे, राजू पवार, सिताराम मस्के, कोंडीबा वाघमारे, रुपेश वाघमारे, रणजीत शिरसागर, दीपक शेळके, महादेव तळेकर, विजय बिराजदार, समाधान शेळके, मच्छिंद्र वाघमारे, राजू शिंदे, नितीन गुळवे, संतोष दांडगे,, समाधान घोडके, साई महमाने, तानाजी महामाने, इत्यादी कार्यकर्ते आर्थिक परिश्रम घेतलेले आहे.

# ग्रामीण कला मंच प्रस्तुत 'कांतार' नाटकाचा प्रयोग अत्रे रंगमंदिरात संपन्न





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर/केतन भोज ; ग्रामीण कला मंच कडून दरवर्षीप्रमाणे यंदाही ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाटय स्पर्धेत उमेश मारुती भेरे लिखित आणि दिग्दर्शित 'कांतार ' या दोन अंकी नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. कल्याण येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात ४ डिसेंबर रोजी सादर झालेल्या या नाटकाला शेकडो प्रेक्षकांनी उपस्थिती दर्शविली होती.

'कांतार ' हे नाटक आजच्या अत्यंत संवेदनशील विषयावर भाष्य करणारे नाटक आहे. माणसाने सध्या निसर्गाची जी हानी केली आहे, त्यामुळे येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती आपण स्वतः वर कसे ओढावून घेत आहोत हे या नाटकातून दाखवण्यात आले आहे. अवकाळी पाऊस, वादळ, वन्य प्राण्यांची मानवी वस्तीतील घुसखोरी या ज्वलंत मुद्द्यावर या नाटकातून प्रकाश टाकण्यात आला आहे. लेखक उमेश भेरे यांनी स्वतः या नाटकाचे दिग्दर्शन, पार्श्वसंगीत आणि नैपथ्य या सगळ्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. प्रकाश योजना विराज देसाई आणि वैभव शिंदे तर रंगभुषा सोहम कोचरेकर यांनी केले. वैशभूषा मैथिली भेरे यांनी अत्यंत प्रभावीपणे साकारली आहे. प्रमुख भूमिकेत नितीन गाडेकर, सुशील शिरसाठ, महेंद्र जाधव, जान्हवी हाटे, ऐश्वर्या विशे,संतोष जाधव,वैशाली पाटील, प्रसाद वैद्य, उपासना किरपण, अविनाश दलाल,धनेश पाटोळे, प्रीतम हजारे,पंढरीनाथ सासे,भरत फर्डे, अरुण चौधरी, विजय मांजे व आमोद करंदीकर यांनी प्रभावी अभिनयातून प्रेक्षकांची दाद मिळवली.

# पॉक्सो कायद्या-अंतर्गत मुंबई उच्च-न्यायालय, कोल्हापूर खंडपीठाकडून अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्या प्रकरणी अटकेतील आरोपीस सशर्त जामीन मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याच्या गंभीर आरोपाखाली अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात दिनांक ०४ मार्च २०२५ रोजी गु.र. क्र. ०१३६/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ६४(२)(आय), १३७(२) आणि ३५१(२) तसेच बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा, २०१२ चे कलम ४, ८ आणि १२ प्रमाणे आरोपी सिद्धलिंगप्पा शिवलिंगप्पा कलदे (वय २८, रा. मदन हिप्परगा, ता. आळंद, जि. कलबुर्गी (गुलबर्गा), राज्य: कर्नाटक) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला होता.

फिर्यादी यांनी दिनांक ०४/०३/२०२५ रोजी दिलेल्या जबाबात नमूद केले की, आरोपी सिद्धलिंगप्पा कलदे हा मैंदर्गी, ता. अक्कलकोट येथील बोरी नावाच्या शेताला लागून असलेल्या शेतात ट्रॅक्टर चालक म्हणून काम करत असे आणि त्यांची व त्यांच्या अल्पवयीन मुलीची आरोपीसोबत गेल्या १५ दिवसांपासून ओळख झाली होती.

दिनांक ०३ मार्च २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता फिर्यादीची मुलगी घरातून बोरी शेताकडे जात असल्याचे सांगून निघाली. दुपारी १२:०० वाजताच्या सुमारास आरोपी सिद्धलिंगप्पा कलदे याने मुलीला भेटून 'तुला घरी सोडतो' असे सांगून आपल्या मोटारसायकलवर बसवले, परंतु तिला मैंदर्गी येथे न सोडता तिच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन तिला जबरदस्तीने मादनहिप्परगा, जि. गुलबर्गा, कर्नाटक येथे पळवून नेले. तेथील मंदिरात फिरवून परत आणले आणि मैंदर्गी येथील बोरी नावाच्या शेतात असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये रात्री ०९:०० वाजताच्या सुमारास तिच्या इच्छेविरुद्ध, अल्पवयीन असल्याचे माहीत असतानाही तिच्यासोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. तसेच, याबद्दल आई-वडिलांना सांगितल्यास त्यांना संपवून टाकेन अशी धमकी देऊन तिला मैंदर्गी नाक्यावर सोडून निघून गेला. त्यानंतर फिर्यादीने पोलीस ठाण्यात येऊन आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली.

आरोपी सिद्धलिंगप्पा शिवलिंगप्पा कलदे यास दिनांक १०/०३/२०२५ रोजी अटक करण्यात आली होती.

तद्नंतर आरोपी सिद्धलिंगप्पा कलदे याने जामिनासाठी मे.जिल्हा व सत्र न्यायालय सोलापूर येथे आपला जामीन अर्ज दाखल केला होता तो अर्ज नामंजूर झाल्यानंतर आरोपी तर्फे मा.मुंबई उच्च न्यायालय कोल्हापूर खंडपीठ येथे जामीन अर्ज दाखल करण्यात आला होता.

सदर प्रकरणी आरोपीतर्फे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, घटना घडली त्या वेळी पिडित मुलगी अंदाजे १५ वर्षांची होती. घटनेनंतरचा कालावधी पाहता, पीडिता सुमारे २४ तास आरोपीसोबत होती, परंतु त्या कालावधीत तिने कोणताही आरडाओरडा केला नाही, मदतीसाठी बाहेरील व्यक्तींशी संपर्क केला नाही किंवा तिला बळजबरी करण्यात आल्याचे तत्काळ संकेत दिले नाहीत. आरोपीस अटक होऊन आजतागायत ८ महिन्यांहून अधिक कालावधी लोटला असून तो संपूर्ण कालावधी न्यायालयीन कोठडीत आहे. आरोपीचे कोणतेही गुन्हेगारी पूर्वइतिहास नसून त्याच्यावर यापूर्वी कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नाही. तसेच सर्व परिस्थितींचा एकत्रितपणे विचार केल्यास, आरोपीस जामीन मंजूर करण्यात यावा. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर मा.न्यायमूर्ती श्री. शिवकुमार दिघे साहेब, मुंबई उच्च न्यायालय कोल्हापूर खंडपीठ यांनी दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी आरोपी सिद्धलिंगप्पा शिवलिंगप्पा कलदे यास सशर्त जामीन मंजूर केला आहे. सदर प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. कदीर औटी, ॲड. सौरभ तांदळे, ॲड. दत्तात्रेय कापुरे, ड. वैभव बोंगे, ॲड. ओंकार फडतरे, ॲड. रोहित थोरात, ॲड. मोहीम पठाण, ॲड. शिवरत्न वाघ, ॲड. मनिष बाबरे, ॲड. अभिषेक नागटिळक, ॲड. अजय वाघमारे आणि ॲड. त्वरिता वाघ यांनी काम पाहिले.

# मविप्र संस्थेला तंत्रशिक्षणातील 'भारतातील सर्वोत्तम संस्था-२०२५' हा आयएसटीईचा पुरस्कार मिळाला




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी/सोमनाथ गिरी : अभियांत्रिकी आणि तंत्रशिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन (ISTE) या राष्ट्रीय व्यावसायिक संस्थेने मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक (मविप्र) यांना 'भारतातील सर्वोत्तम शैक्षणिक संस्था - २०२५' हा मानाचा पुरस्कार आज २९ नोव्हेंबर रोजी पुद्दुचेरी येथे मिळाला. कार्यक्रमप्रसंगी श्री. सत्य पाल सिंह, मा. केंद्रीय राज्यमंत्री मानव संसाधन विकास (उच्च शिक्षण), खडढए चेअरमन डॉ. प्रतापसिंह के. देसाई, यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुद्दुचेरी येथील श्री मनकुला विनायगर अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित ५५ व्या ISTE राष्ट्रीय वार्षिक प्राध्यापक अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी मविप्र संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीनजी ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, मविप्र संचालक ॲड. संदीप गुळवे, रमेश पिंगळे, ॲड. लक्ष्मण लांडगे, डॉ. सतीश देवणे, प्राचार्य, मविप्र केबीटी अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक, प्रा. प्रशांत एन. पाटील, प्राचार्य, मविप्र आरएसएम पॉलिटेक्निक, नाशिक इत्यादी मान्यवर उपस्थित होते. संस्थेच्या वतीने सर्व पदाधिकाऱ्यांनी ISTE चे मनःपूर्वक आभार मानले.

# इंदापूर तालुक्यातील निमसाखर या गावांमध्ये दत्त जयंती उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


इंदापूर/प्रतिनिधी : गणेश धनवडे इंदापूर तालुक्यातील निमसाखर या गावांमध्ये दत्त जयंती उत्साहात साजरी झाली. सकाळी दत्त मंदिरामध्ये श्री रामचंद्र नारायण महारनवर यांच्याकडून पादुकाला अभिषेक घालण्यात आला आणि दुपारी महादेव भजनी मंडळ निमसाखर यांचा भजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यानंतर बारा वाजता श्रीच्या चरणावर पुष्पवृष्टी झाली नंतर ग्रामस्था तर्फे महाप्रसाद देण्यात आला आणि संध्याकाळी सात वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखीची ग्राम प्रदक्षिणा काढण्यात आली नंतर मंदिरामध्ये स्वामींची आरती व जप घेण्यात आला.

या कार्यक्रमाला निमसाखर मधील सर्व स्वामी भक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते आणि श्री अशोक शंकर होमकर यांच्या तर्फे महाप्रसाद देण्यात आला.

**धूर, राख, धुळीने माखलेला परिसर लामजना ,खरोसा मंडळातील प्रकार**

**अनधिकृत विटभट्ट्यांची संख्या मोठ्या झपाट्याने वाढ**

# वीट भट्ट्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : राष्ट्रीय महामार्ग लगतच्या विटभट्यामुळे वायू प्रदूषण होऊन वाहनधारक व स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे .राख ,धुर रस्त्यावरील धूळ व विषारी धुर त्यामुळे शुद्ध हवा नष्ट होऊन वायू प्रदूषण वाढले आहे ,लामजना सह औसा रोड ,निलंगा रोड ,खरोसा आनंदवाडी ,किल्लारी रोड ,सह भागात गेल्या दोन वर्षापासून या ठिकाणी विट भट्याची संख्या मोठ्या झपाट्याने वाढत चालली आहे ,ज्या ठिकाणी वीटभट्ट्या उद्योग चालवले जातात त्याच शेतीतील शेतीसाठीचा विमा भरला जात असल्याचेही यापूर्वी पाहायला मिळालेले आहे, वीटभट्टीच्या विषारी धुरामुळे नागरिकांच्या आरोग्यावर घनिष्ट परिणाम होत असल्याने ,राज्य प्रदूषण मंडळाचे याकडे दुर्लक्ष कसे? असा प्रश्न असुन लामजना पाटी परिसरातील वीटभट्ट्यामुळे लामजना ते निलंगा, औसा, सह किल्लारी रस्त्यावरील विटबट्ट्यामुळे रस्त्यावरच धुळीचा साम्राज्य झाला असून ,रात्र दिवस या वीटभट्ट्यातून निघणाऱ्या विषारी धुरामुळे वाहनधारकांना समोरून येणारी वाहने दिसत नाहीत रस्त्यावर विटाचे टुकडे चिखल ,राख पडत आहे व जाणार्या येणार्या वाहनांच्या वार्यामुळे हीच विषारी राख लोकांच्या नाका तोंडात धूर जात असल्याने नागरिकांना श्वसनाचे आजार वाढले आहेत ,गेल्या वर्षभरामध्ये अनेक अनधिकृत विटभट्ट्यांची संख्या मोठ्या झपाट्याने वाढली आहे,

काही अनधिकृत वीट भट्ट्याची नागरिकांनी व वाहण धारकांनी तक्रारी केल्यास उडवाउडवीची उत्तरे दिली जातात, दिवसेंदिवस या भागात अनधिकृत विटभटयाची संख्या वाढत असून महसूल विभाग डोळे मिटून गप्प का? असा नागरिकांना पडलेला पडलेला प्रश्न आहे

प्रदूषण नियंत्रक मंडळानुसार इंधन म्हणून वापरात येणाऱ्या दगडी कोळशाच्या ज्वलनानंतर सल्फर हाय ऑक्साईड ,कार्बन डाय-ऑक्साइड ,कार्बन मोनो ऑक्साईड ,आणि नायट्रोजन मधील ऑक्साईड या विषारी वायूचे उत्सर्जन होते व याच विषारी वायू मुळे व सल्फर डाय-ऑक्साइडमुळे डोळ्यांचे विविध विकार आणि हवेतील नायट्रोजन मधील ऑक्साईडमुळे फुफ्फुस व त्वचेचे आजार होतात कार्बन मोनो ऑक्साईड आणि कार्बन डाय-ऑक्साइड या विषारी वायूमुळे वीटभट्ट्यांच्या परिसरातील तापमानात वाढ होऊन सभोवतालच्या शेतीपीकावर व नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याने नागरीक त्रस्त आहेत, लामजना औसा रोड निलंगा रोड खरोसा, आनंदवाडी भागा सह औसा रोड, किल्लारी रोड ,भागात गेल्या दोन वर्षांमध्ये वीटभट्ट्यांची संख्या मोठ्या झपाट्याने वाढत चालली आहे ज्या ठिकाणी वीटभट्ट्या उद्योग चालवल्या जातात त्याच शेतीसाठीचा पीक विमा भरला जात असल्याचेही यापूर्वी पाहायला मिळालेले आहे या वीटभट्टयामुळे व यातुन निघणाऱ्या विषारी धुरामुळे परिसरात प्रदूषण वाढत चालले आहे ,त्यामुळे या परिसरातील वस्त्यामधील राहणार्या नागरिक ,अबाल वृद्ध व शालेय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे ,वीट भट्टीतून निघणाऱ्या प्रदूषणामुळे कर्करोग ,दमा अस्थमा,सह लहान मुलांच्या आजारात मोठी वाढ झाली आहे महसूल चे कर्मचारी म्हणतात वीटभट्ट्या अनधिकृत आहेत तर मग त्या ठिकाणी जमा करण्यात आलेल्या काळी व लाल मातीवर मोठ्या प्रमाणात महसूल गोळा केला जातो तो कसा? काही लोकांसाठी वीटभट्टी वायू प्रदूषणाचा विळखा असताना मात्र ठरावीक लोकांसाठी विटभट्टी ही सोन्याचे अंडी देणारी कोंबडी ठरत आहे, सकाळची शुद्ध हवा ऑक्सिजन मिळण्याऐवजी या भागातील नागरिकांना केमिकल युक्त वायू श्वसन हवेचा सामना करावा लागतोय यामुळे मॉर्निंग वॉक करणाऱ्या परिसरातील नागरिकांच्या प्रकृतीस धोका निर्माण होत आहे या लामजना खरोसा सह परिसरात अशा अनेक वीटभट्ट्या असून यावर प्रशासन योग्य कारवाई करत नसल्याने नागरिकातून नाराजी व्यक्त होत आहेत या गंभीर समस्या कडे संबंधित प्रशासन गंभीरतेने पाहत नसल्यामुळे सर्वत्र बेकायदेशीर वीटभट्ट्या सुरू झाल्या असून यांच्या धुरामुळे विषारी वायू पसरून प्रदूषणात वाढ झाली आहे या समस्या कडे तहसील व प्रदूषण महामंडळाच्या वरिष्ठांनी लक्ष द्यावे अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे,,,,

प्रदूषण विभाग झोपेत ?

विटभट्यावर इंधन म्हणून राख वापरले जाते त्याचा उग्र वास वाढून वायू प्रदूषणात भर पडली आहे लहान मुलांना वाहनधारकांना,अबालवृद्धांना फुफुसांच्या आजार होऊ शकतो नियंत्रण मंडळाने वीटभट्टया मुळे होणारा प्रदूषणाचा धोका ओळखून संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित कार्यवाही करण्याची गरज असताना याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष कशामुळे असा प्रश्न पडला असुन प्रदूषणामुळे आरोग्याचा प्रश्न बिकट झाल्यास त्याची फार मोठी किंमत सामान्य नागरिकांना मोजावी लागेल अशी नागरिकांना भीती आहे याकडे जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष देऊन सखोल चौकशी करून कारवाई करावी अशी वाहनधारकातून व स्थानिक नागरिकांतून मागणी होत आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी पंढरपुरात आदरांजली

## राष्ट्रवादी व्यापार उद्योग विभागाकडून पुष्पहार अर्पण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शोषित-वंचितांच्या आत्मसन्मानाला नवा आयाम देणाऱ्या महामानवाला संपूर्ण देशाचे वंदन.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार थोर समाजसुधारक आणि कायदे पंडित भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिन आहे त्यानिमित्त देशभरात बाबासाहेबांच्या स्मृतीस वंदन करण्यात आले.

शोषितांना आणि वंचिताना आत्म सामानाने जगण्याचा हक्क मिळवून देणारे तसेच एकता, समता, आणि बंधुता या मूल्यांसाठी आयुष्य वेचलेली डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रेरणा आजही या देशाला कणा आहे. त्यांच्या कार्याला वंदन करण्यासाठी आज पंढरपूर शहरातील आदरांजलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

पंढरपूर येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास आज राष्ट्रवादी व्यापार व उद्योग विभागाचे प्रदेशाध्यक्ष मा श्री नागेश फाटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना श्री फाटे यांनी बाबासाहेबांचे सामाजिक व घटनात्मक योगदान अमूल्य असल्याचे नमूद केले तसेच उपस्थितांना बाबासाहेबांच्या विचारांवर घालून सामाजिक समतेसाठी कटिबद्ध राहण्याची आव्हान केले. यावेळी आरपीआय नेते सुनील सर्व गोड, आरपीआय नेते जितेंद्र बनसोडे, पैलवान गायकवाड भास्कर गायकवाड विनय शिंदे निवृत्ती भाटकर, नागेश काळे पत्रकार रामभाऊ सरवदे, चैतन उत्पाद रवींद्र शेवडे, तसेच अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वांनी मिळून या महान नेत्याच्या कार्यास आणि विचारांना आदराने वंदन केले.

## श्री माणकेश्वर वाचनालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : १०६ वर्षांची वाचन परंपरा जपणाऱ्या निफाड येथील श्री माणकेश्वर वाचनालयात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. नाशिक जिल्हा कांदा बटाटा संघाचे चेअरमन बापूसाहेब कुंदे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले.

याप्रसंगी वाचनालयाचे माजी संचालक अशोकराव पगारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा वाचनालयास भेट दिली. त्याबद्दल वाचनालयातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.

नाशिक जिल्हा कांदा बटाटा संघाचे नवनिर्वाचित चेअरमन बापूसाहेब कुंदे यांचाही त्यांच्या निवडीबद्दल सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बापूसाहेब कुंदे, वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, चिटणीस बाळासाहेब कापसे यांनी मनोगत व्यक्त केले. तर सुहास सुरळीकर यांनी सूत्र संचालन केले. याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, उपाध्यक्ष डॉ. सौ मेघा जंगम, चिटणीस प्रा. बाळासाहेब कापसे, हिशोब तपासणीस दत्ताकाका उगावकर, संचालक तन्वीर राजे, सुहास सुरळीकर, बाळासाहेब कर्डिले, प्रा.महेश बनकर, राजेंद्र खालकर, सुनील चिखले माजी संचालक संजय घुमरे, अशोक पगारे,प्र. ग्रंथपाल नितीन बनसोडे, कर्मचारी नंदकुमार पुंड, अनिता इस्ते उपस्थित होते.

## जि.प तांदुळवाडी शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी येथे महामानव, प्रज्ञारत्न ,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अभिवादन करण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक तथा राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य सरचिटणीस श्री संतोष भोजने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना थोर विचारवंत आणि कृतीशील आचरणातून समाजाला योग्य दिशा देणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर समजावताना बाबासाहेब केवळ त्यांच्या दलित उद्धारक कार्यामुळेच नव्हे तर सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आरोग्य,शेती यातही काळाच्या कितीतरी पुढे जाऊन विचार करणारं व्यक्तीमत्व होते याबद्दल अतिशय सोप्या पद्धतीने मुलांना समजावून सांगितले. शाळेतील सहशिक्षक श्री



संतोष मोहिते सर आणि श्रीमती रसिका आगरकर यांनीही याप्रसंगी समायोचित मार्गदर्शन केले.कु.ऋजुता मोरे, अंकिता अंबुरे, श्रुती माने यांनी शेरोशायरी च्या माध्यमातून,श्रेया डिकले, अक्षरा बनसोडे सम्यक राऊत यांनी गीताच्या माध्यमातून. आणि चि संघरत्न राऊत,प्रज्वल बाकले, अजिंक्य नाईकनवरे,शिवम डिकले,आणि सार्थक धाबेकर यांनी भाषण करत आदरांजली अर्पण केली.या कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन उपक्रमशील शिक्षिका श्रीमती आशा पवार यांनी तर आभारप्रदर्शन श्री सयाजी शिंदे, यांनी मानले.



## डॉ.आंबेडकर यांचे विविध क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय : मुख्याध्यापक उगले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले होते. व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षक सोमनाथ गिरी, कचेश्वर शिंदे, रेखा खंडीझोड, सुनिल ससाणे आदी उपस्थित होते. उपस्थितींच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. आंबेडकर यांच्या जीवन व कार्याचा पर्यवेक्षिका जयश्री पगारे, मानसी हिरे विद्यार्थ्यांनीसह उपशिक्षक रेवणनाथ कांगणे यांनी करून दिला.सम्यक रुपवते व संकल्प रुपवते यांनी डॉ. आंबेडकरांवर गीते सादर केली.




### डुबेरे येथील जनता विद्यालयात डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

यावेळी बोलतांना विद्यालयाचे मुख्याध्यापक उगले म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी आयुष्यभर कार्य केले. भारतीय राज्यघटना तयार करण्यासाठी त्यांनी अविरत परिश्रम घेतले म्हणून त्यांना भारतीय घटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते. जातीयभेद, सामाजिक विषमता दूर करण्यासाठी प्रयत्न केले. डॉ आंबेडकर यांचे विविध क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे म्हणून डॉ. आंबेडकर यांचा कार्याचा इतरांनी आदर्श यावा असे आव्हान उगले यांनी शेवटी केले. सूत्रसंचालन कुमारी अंकिता ढोली हिंर तर आभार तनुजा निमसे हिने मानले.

यावेळी डी.ए.रबडे, राजश्री बोडके, वरिष्ठ लिपिक राणी शिंदे, रोहिणी भगत,शिवाजी गुरुळे, रामदास वारुंगसे, वृषाली घुमरे, किशोर शिंदे, रवि गोजरे, अरुण जारस, रेवगडे आदींसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रेणापूर:प्रतिनीधी, सुधाकर रणदिवे,- रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन व रेणुका अध्यापक विद्यालय रेणापूर येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळेस डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्र .प्राचार्य उमेश रणदिवे यांनी केले. यावेळी प्रा. रमाकांत गायकवाड आणि अविनाश कसबे , आफरीन देशमुख, लहू मुरकुटे, कु जोडतले दिपाली इ छात्र अध्यापकानी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून लेखापाल राधिका माने मॅडम,व प्रा उत्तम दूधभाते यांची उपस्थिती होती. प्रा उत्तम दुधभाते यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल सखोल मार्गदर्शन केले.

व्यासपीठावर प्राचार्य रतन लहाने प्र.प्राचार्य उमेश रणदिवे, प्रा रमाकांत गायकवाड, लेखापाल राधिका माने,ग्रंथपाल मनिषा लातूरकर यांची उपस्थिती होती.अध्यक्षीय समारोप रेणुका अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य रतन लहाने सर यांनी केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आशिष खंडागळे यांनी केले तर आभार प्रदर्शन कु ज्योती मिसाळ यांनी केले .यावेळी डी एल एड व बी एड चे छात्र अध्यापक यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी योगेश माने,अजय बद्दर, अभिषेक जाधव व दत्ता चादरे यांनी सहकार्य केले.

### चैत्यभूमी येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना रामदास आठवलेंनी केले विनम्र अभिवादन

## तोडणारे तुटतील असे भारताला संविधानातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतूट जोडले आहे : केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून भारत देशाला असे अतुट जोडले आहे की जे या देशाला तोडू पाहतील तेच तुटून जातील. विविधतेने नटलेल्या भारताला एकजूट; एकसंघ; अखंड आणि अभेद्य ठेवणारे भारताचे संविधान महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिले आहे याचा आम्हाला अभिमान आहे असे प्रतिपादन रिपब्लिकन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केले.चैत्यभूमी येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र श्रद्धांजली ना.रामदास आठवले यांनी वाहिली.यावेळी त्यांच्या पत्नी सौ



सीमाताई आठवले पुत्र जीत आठवले रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे ; माजी मंत्री अविनाश महातेकर; काकासाहेब खंबाळकर ; हेमंत रणपिसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी उभा केलेला मानवमुक्तीचा संगर हा संपूर्ण जगात मानवाधिकार चळवळीला प्रेरणा देणारा लढा आहे. एक व्यक्ती एक मत एक मूल्य या तत्वाने भारतात राजकीय समता स्थापन करून सामाजिक आणि आर्थिक समतेचे उद्दिष्ट्य त्यांनी देशाला दिले. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार भारत देशाला घडविणारे विचार आहे. त्यांनी केवळ दलित समुदायाचा उद्धार केला नाही तर सर्व समाज घटकांच्या कल्याणचा विचार करून संपूर्ण भारत देशाचा उद्धार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केला आहे. समता; बंधुता; सामाजिक न्याय आणि राष्ट्रीय एकात्मता मजबूत करण्याचा पाया महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी रचला आहे असे सांगत ना. रामदास आठवले यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिकारी स्मृतींना विनम्र अभिवादन केले.

## महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तुळजापूर येथे भारताचे संविधान करते, भारतरत्न, महामानव ,बोधिसत्व, भारतीय घटनेचे शिल्पकार , पुस्तकावर जीवापाड प्रेम करणारे , संघर्ष हेच जीवन आहे असे आपल्या जीवनातून प्रत्यक्ष दाखवणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. यावेळी सर्वप्रथम विद्यालयाचे आदरणीय प्राचार्य श्रीमान घोडके सर, पर्वेक्षक डॉ. पेटकर सर तसेच विशेष निमंत्रित शिक्षक यामध्ये जीवशास्त्रीय विभागाच्या श्रीमती माने मॅडम ,संगणकशास्त्र विभागाच्या प्रमुख श्रीमती नाशे मॅडम, उच्च माध्यमिक विभागातील इंग्रजी विषयाच्या शिक्षिका श्रीमती सुरवसे मॅडम तसेच माध्यमिक विभागातील



इंग्रजी विषयाचे शिक्षक श्री सुत्रावे सर या उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर विद्यालयातील छोट्या विद्यार्थ्यांनी इयत्ता सातवी आणि इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये सर्वप्रथम अर्णव रूपदास, कृष्णा मैदाड,विराज लाटे, सोहम संकपाळ, शुभम कलमले, तेजस सुपनावर, चिन्मयराजे गोसावी,राघव सुर्यवंशी इत्यादी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .सदरील कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री सलगर सर यांनी आदरणीय प्राचार्य श्रीमान घोडके सर यांच्या मार्गदर्शनाने केले. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन विभाग प्रमुख श्री सलगर सर यांनी केले व शेवटी कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.